# श्री गोदे ! भवतापहारी

त्र्यंबकेश्वर-नाशिक

९८६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. ५०८





REFBK-0017202

सांस्कृतिक महाराष्ट्र : ७

का-प्रवास
७५९८८
२२३।७१-
५०४

# श्रीगोदे, भवताप हरी!

## त्र्यंबकेश्वर - नाशिक

तुझ्या धूलिमाजीं वाटे लोळणें सुखाचें,
जिथें पाय पावन फिरले राम-जानकीचे !

—साने गुरुजी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नं. ५५९८७ वि. भ-प्रवास
क्र. ५०४ दि. २२।३।७१

रामचंद्र चिन्तामण ढेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 96202
शाखा (स्थळ)

किंमत
७५
पैसे

REFBK-0017202
REFBK-0017202



वोरा अॅण्ड कंपनी, पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : १०२ : २ [ १२-६० ]
© १९५८
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

✠

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शन-माला : ७

✠

चौथी आवृत्ति : १९६७

✠

किंमत ७५ पैसे

✠

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

✠

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ,
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्राय. लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी मुंबई २.

✠

मुद्रक :

अनंत जे. शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.

## सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें, तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि; त्या त्या स्थानांतील महत्त्वाच्या मूर्तींचीं, स्थळांचीं सुरेख विश्वसनीय चित्रें; तेथें जाण्याचे रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशींचे कार्यक्रम यांची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें. या पुस्तकांतील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी महिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचें समाधान अवश्य लाभेल.

* मोठा, जाड टाइप; सोपी भाषा; आकर्षक मांडणी.
* हीं पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रांतील तीर्थयात्रा आणि संतदर्शनें. भाविक यात्रेकरूंना आणि चिकित्सक प्रवाशांनाहि मार्गदर्शक. शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांना अति उपयुक्त.
* डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मुंबई राज्य-कडून शालेय ग्रंथालयांसाठीं शिफारस.
* लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरांसाठीं पुरस्कृत.
* असिस्टंट क्यूरेटर ऑफ् लायब्ररीज महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस केलेलीं.

# श्रीगोदे, भवताप हरी !

## १ : त्र्यंबकेश्वर

महाराष्ट्राची लोकमाता :

गोदावरी ही महाराष्ट्राची लोकमाता आहे. इथलें लोकजीवन तिचेंच स्तन्य पिऊन पुष्ट झालें आहे. तिच्या अंगाखांद्यावर बागडतांना मराठी लोकजीवनानें धर्म-संस्कृतीचे पहिलेवहिले पाठ गिरवले आहेत आणि तिच्याच स्निग्ध छायेच्या आसऱ्यानें पुरुषार्थाचे गगनवेधी प्रासाद उभारले आहेत. तिच्या जीवनरसांत आर्यद्रविडांनीं आपल्या जीवन-प्रवाहांचा संगम साधला आहे. महर्षि गौतमाच्या पापहरणासाठीं प्रगटलेल्या या जीवनदायिनीनें ऋषींना मंत्र-स्फूर्ति दिली आहे. कवींच्या कल्पनांचा फुलोरा फुलविला आहे; आणि संतांच्या हृदयांत करुणेचें कुंड निर्माण केलें आहे. गोदावरी म्हणजे महाराष्ट्राच्या अभिजात संस्कृतीचें प्रवाही प्रतीक आहे. अगस्त्य-भार्गवादि तपोनिधींची शुभंकर साधना, मर्यादापुरुषोत्तम रामचन्द्राची विरह-वेदना, सातवाहनांच्या विजिगीषु विक्रमाच्या खुणा आणि गोरखनाथांपासून एकनाथांपर्यंतच्या साधुसंतांची विश्वव्यापी करुणा हिच्या जळगर्भांत अजूनहि जागी आहे. हे तिचें सामर्थ्य स्मरूनच कवि चन्द्रशेखरांनीं तिची विनम्रभावानें विनवणी केली –

"जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे, भवताप हरी !"

चन्द्रशेखरप्रमाणेंच तुमची-आमचीं मनेंहि भवतापानें भाजून निघालीं आहेत. पोळलेल्या मनांना शीतलता लाभावी

म्हणून आपणहि गोदावरीच्या तीर्थजळाचा आश्रय घेऊं या. कारण या भूमीवर तिचें अवतरण पाप-ताप दूर करण्यासाठींच झालें आहे.

<u>हनुमानाची जन्मभूमि :</u>

गोदावरीचें उगमस्थान असलेला ब्रह्मगिरि नाशिकपासून केवळ अठरा मैलांवर आहे. सन १८७१ सालीं नाशिकपासून त्र्यंबकेश्वरापर्यंत सडक तयार झाली. त्यामुळें भाविकांची आणि जिज्ञासूंची वाट सुलभ झाली आहे. या सडकेवरून धावणाऱ्या एस्. टी.च्या बसनें आपण त्र्यंबकेश्वराच्या दर्शनाला जाऊं. नाशिकपासून सोळा मैलांवर असलेली वाणगंगा ही क्षेत्राची पूर्वसीमा मानली जाते. वाणगंगेच्या आधीं आपणांस अंजनेरीच्या पायथ्याशीं असलेल्या गणेशखिंडींतून पुढें जावें लागतें. येथून सुमारें दोन फर्लांगावर अंजनेरी गांव आहे. त्र्यंबकेश्वराच्या मंदिराजवळ वस्ती वाढण्यापूर्वीं, जेव्हां हा मार्ग असुरक्षित होता तेव्हां, यात्रिकांच्या मुक्कामाचें स्थान हें अंजनेरी गांव असे. अंजनेरी हा एक गिरिदुर्ग आहे. दक्षिण बाजूनें वर जाण्याचा मार्ग असून तीन बाजूंना तुटलेले कडे आहेत. आज केवळ वृक्ष-वेलींशीं सोयरिक करून राहिलेला हा अंजनेरी एके काळीं आभीर राजांच्या राजधानीनें नटला होता. अटकेपार भगवा झेंडा फटकावणाऱ्या राघाभरारीचा वसंतनिवासहि या अंजनेरीवर असे.

मूळचा हा इंद्रपर्वत. परंतु रामदूत हनुमानाला जन्म देणाऱ्या अंजनीनें इथें तप केलें, म्हणून हा अंजनेरी बनला. त्या वीरमातेच्या तपाचा गौरव करण्यासाठीं जणुं निसर्गदेवीनेंच तिचें शिलास्मारक येथें उभारलें आहे. जन्मतांच बालसूर्याचा ग्रास घेऊं पहाणाऱ्या त्या तेजस्वी बालकाला हृदयाशीं धरून जणुं ती विराट् वानरीच इथें कृष्णपाषाणाच्या रूपानें निश्चल बसली आहे.

तिच्या त्या जगावेगळ्या बालकानें आपणांस एक संदेश दिला आहे कीं, शक्तीनें सत्याचें दास्य पत्करलें पाहिजे. जो 'रामदास' होईल, त्यालाच 'समर्थ' पदवी प्राप्त होईल. या भावना मनांत आल्या कीं, मन सहजच त्या आद्य 'रामदासा'चें स्तवन गाऊं लागतें –

मनोजवं मारुततुल्यवेगम् । जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यम् । श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥

पुराणांतील ब्रह्मगिरि :

त्र्यंबकेश्वर हें भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक प्रसिद्ध स्थान आहे. पुराणांनीं या पुराण क्षेत्राचा महिमा मुक्तकंठानें गायिला आहे : एकदां ब्रह्मदेवास वाटलें कीं, 'मी सृष्टिकर्ता असल्यामुळें शिवमहिमा काय तो मलाच माहीत आहे.' हें भगवान विष्णूला समजल्यावर त्यानें विनयानें कबुली दिली कीं, 'मीं पुष्कळ तप केलें, परंतु मला अजूनहि शिवाचें ज्ञान झालें नाहीं.' शेवटीं ब्रह्मा आणि विष्णु यांच्यांत असें ठरलें कीं, ब्रह्मदेवानें शिवाच्या मस्तकाचा शोध लावावा आणि विष्णूनें त्याच्या चरणांचा शोध लावावा. पुष्कळ काळ शोध घेऊनहि कुणालाच यश येईना. तेव्हां ब्रह्मदेवानें एक कारस्थान रचलें. केतकीपुष्प आणि गाय निर्माण करून त्यांची खोटी साक्ष आपल्या बाजूनें तयार केली आणि देवलोकीं जाऊन सांगितलें कीं, 'मीं शिवाच्या मस्तकाचा शोध लावला असून, त्याची दुग्धाभिषेकानें आणि केतकीपुष्पानें पूजा केली आहे.' हें ऐकून इंद्रादि देवांना शंका आली आणि शंका-निरसनार्थ ते सर्व शिवलोकीं गेले. शिवानें ब्रह्मदेवाचें कपट ओळखलें आणि त्याला शाप दिला कीं, 'तूं भूतलावर अपूज्य होशील.' याच क्रोधाच्या आवेगांत शिवानें केतकीपुष्पाचा आपल्या पूजाद्रव्यांतून त्याग केला आणि गाईला शाप दिला कीं,

'ज्या मुखानें तूं खोटी साक्ष दिलीस तें तुझें मुख सदैव अपवित्र राहील !' शिवाच्या शापानें क्रुद्ध झालेल्या ब्रह्मदेवानें शिवाला प्रतिशाप दिला : 'तूं भूतलावर पर्वत होऊन राहशील !' रागाचा हा पहिला आवेग ओसरल्यावर ब्रह्मदेवानें मनोमन विचार केला आणि पुनः शिवकृपा संपादण्यासाठीं शिवाची स्तुति केली. ब्रह्म-देवाचें मन निवळलेलें पाहून भोला शिव प्रसन्न झाला आणि तो भूतलावर ब्रह्मदेवाचें नांव स्वतःच्या प्रतीकाशीं जोडून नांदूं लागला. तोच हा ब्रह्मगिरि. ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं त्र्यंबकेश्वराचें मंदिर असलें तरी, खरा त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरीच्याच रूपानें उभा आहे.

### आर्य-द्रविडांचा प्रीतिसंगम :

लिंग-प्रतीकानें पूजिली जाणारी ही शिवदेवता आर्य-द्रविडांच्या प्रीतिसंगमाची साक्ष आहे. आर्यांना लिंगपूजा मान्य नव्हती. 'लिंगपूजक आमच्या सत्कर्मांत विघ्नें न करोत' अशी एका वैदिक ऋषीची प्रार्थना आहे. आर्यांची रुद्रदेवताच द्रविडांच्या लिंगपूजेचे संस्कार घेऊन शिवरूपांत परिणत झाली. आर्यांचा रुद्र निसर्गांतल्या भव्यतेचें, रौद्र स्वरूपाचें प्रतीक आहे. तो जणुं प्रत्यक्ष पराक्रम आहे. त्याची कांति कापरासारखी शुभ्र आहे. तो सिंहासारखा उग्र आहे. गृत्समद नांवाचा एक ऋषि रुद्राची प्रार्थना करतांना म्हणतो : "हे रुद्रा ! पुत्रपौत्र आणि सेवक यांच्यासह आमची अभिवृद्धि कर. आम्हांला औषधींचें ज्ञान देऊन आमच्या जखमी सैनिकांच्या जखमा बुजव. आमच्यावर अभीष्टसिद्धींची वृष्टि कर. आमच्यांतला द्वेषभाव नाहींसा कर. आमच्या ज्ञानरवीवर अज्ञानाचे ढग येऊं देऊं नकोस."

पुढें आर्य-द्रविडांच्या संस्कृतिसंगमांत हा निर्गुण-निराकार विराट् रुद्र सगुण-साकार बनला. कैलास हें त्याचें निवासस्थान आणि स्मशान हें क्रीडास्थान. पांच मुखें, तीन डोळे, गळ्यांत

नरमुंडांच्या माळा. अंगावर सर्पांचीं भूषणें, मस्तकावरील जटाभारां-तून वाहणारी गंगा, कपाळीं चिताभस्म — अशा विचित्र रूपानें नटलेला हा नटराज विश्वाच्या संहारणीचें कार्य करूं लागला. परंतु तो 'रुद्र' असूनहि 'शिव' आहे. भक्तीनें तो प्रसन्न होतो. विश्वाची आल्हादिनी शक्ति त्याची अर्धांगी होऊन राहिली आहे. त्याचमुळें हा रुद्र-शिव जणुं जीवनांतील सुख-दुःखांच्या एकरस अनुभवाची जाणीव देणारा बनला आहे. भारताच्या भक्तिप्रधान संस्कृतींत शिव-महिमा एकसारखा निनादत राहिला आहे. विष्णु-पूजक वैष्णव आणि शिवपूजक शैव असे दोन भक्तिप्रवाह गेलीं दोन हजार वर्षें भारतीय लोकमानसाचें शुद्धीकरण करीत राहिले आहेत. भारतांत असें एकहि गांव नाहीं, कीं जेथें शिवमंदिर नाहीं.

## त्र्यंबकेश्वरींचें शिवदर्शन

पांचशें वर्षांपूर्वींपर्यंत त्र्यंबकेश्वर हा पूर्णपणें 'वन-वासी' होता. पांचशें वर्षांपूर्वीं देवापासून कांहींशी दूर, ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं त्रिंबक खेड्याची वस्ती झाली. यात्रिकांची आणि नित्यपूजकांची सोबत नसल्यामुळें त्र्यंबकेश्वर अगदीं एकाकी होता. गगनाच्या पात्रांतून वरुण त्यावर अभिषेक करीत असे; उत्तुंग वृक्ष त्याच्या मस्तकीं पानें ढाळीत असत; वारा त्याचें प्रांगण स्वच्छ करीत असे; आणि रानवेली त्याची सुगंधपूजा बांधीत असत. परंतु पुढें पेशवाईत सारेंच वातावरण बदललें. नानासाहेब पेशव्यांनीं पूर्वीच्या ढांसळत्या मंदिराच्या जागीं त्र्यंबकेश्वराचें हें भव्य मंदिर उभारलें. जोगळेकर नांवाच्या गृहस्थांना त्र्यंबकेश्वराच्या देवस्थानाचे कारभारी नेमून देवाच्या नित्य उपासनेची व्यवस्था केली. ब्राह्मण सेवेकरी देवाच्या नित्य सान्निध्यांत राहून त्रिकाळ पूजा करूं लागले. या व्यवस्थेमुळें भक्त-भाविकांची दर्शना-साठीं दाटी होऊं लागली. स्वाभाविकपणेंच त्रिंबक खेडेंहि

'ज्या मुखानें तूं खोटी साक्ष दिलीस तें तुझें मुख सदैव अपवित्र राहील !' शिवाच्या शापानें क्रुद्ध झालेल्या ब्रह्मदेवानें शिवाला प्रतिशाप दिला : 'तूं भूतलावर पर्वत होऊन राहशील !' रागाचा हा पहिला आवेग ओसरल्यावर ब्रह्मदेवानें मनोमन विचार केला आणि पुनः शिवकृपा संपादण्यासाठीं शिवाची स्तुति केली. ब्रह्मदेवाचें मन निवळलेलें पाहून भोला शिव प्रसन्न झाला आणि तो भूतलावर ब्रह्मदेवाचें नांव स्वतःच्या प्रतीकाशीं जोडून नांदूं लागला. तोच हा ब्रह्मगिरि. ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं त्र्यंबकेश्वराचें मंदिर असलें तरी, खरा त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरीच्याच रूपानें उभा आहे.

## आर्य-द्रविडांचा प्रीतिसंगम :

लिंग-प्रतीकानें पूजिली जाणारी ही शिवदेवता आर्य-द्रविडांच्या प्रीतिसंगमाची साक्ष आहे. आर्यांना लिंगपूजा मान्य नव्हती. 'लिंगपूजक आमच्या सत्कर्मांत विघ्नें न करोत' अशी एका वैदिक ऋषीची प्रार्थना आहे. आर्यांची रुद्रदेवताच द्रविडांच्या लिंगपूजेचे संस्कार घेऊन शिवरूपांत परिणत झाली. आर्यांचा रुद्र निसर्गांतल्या भव्यतेचें, रौद्र स्वरूपाचें प्रतीक आहे. तो जणुं प्रत्यक्ष पराक्रम आहे. त्याची कांति कापरासारखी शुभ्र आहे. तो सिंहासारखा उग्र आहे. गृत्समद नांवाचा एक ऋषि रुद्राची प्रार्थना करतांना म्हणतो : "हे रुद्रा ! पुत्रपौत्र आणि सेवक यांच्यासह आमची अभिवृद्धि कर. आम्हांला औषधींचें ज्ञान देऊन आमच्या जखमी सैनिकांच्या जखमा बुजव. आमच्यावर अभीष्टसिद्धींची वृष्टि कर. आमच्यांतला द्वेषभाव नाहींसा कर. आमच्या ज्ञानरवीवर अज्ञानाचे ढग येऊं देऊं नकोस."

पुढें आर्य-द्रविडांच्या संस्कृतिसंगमांत हा निर्गुण-निराकार विराट् रुद्र सगुण-साकार बनला. कैलास हें त्याचें निवासस्थान आणि स्मशान हें क्रीडास्थान. पांच मुखें, तीन डोळे, गळ्यांत


नरमुंडांच्या माळा. अंगावर सर्पांचीं भूषणें, मस्तकावरील जटाभारां-तून वाहणारी गंगा, कपाळीं चिताभस्म – अशा विचित्र रूपानें नटलेला हा नटराज विश्वाच्या संहारणीचें कार्य करूं लागला. परंतु तो 'रुद्र' असूनहि 'शिव' आहे. भक्तीनें तो प्रसन्न होतो. विश्वाची आल्हादिनी शक्ति त्याची अर्धांगी होऊन राहिली आहे. त्याचमुळें हा रुद्र-शिव जणुं जीवनांतील सुख-दुःखांच्या एकरस अनुभवाची जाणीव देणारा बनला आहे. भारताच्या भक्तिप्रधान संस्कृतींत शिव-महिमा एकसारखा निनादत राहिला आहे. विष्णु-पूजक वैष्णव आणि शिवपूजक शैव असे दोन भक्तिप्रवाह गेलीं दोन हजार वर्षें भारतीय लोकमानसाचें शुद्धीकरण करीत राहिले आहेत. भारतांत असें एकहि गांव नाहीं, कीं जेथें शिवमंदिर नाहीं.

### त्र्यंबकेश्वरींचे शिवदर्शन

पांचशें वर्षांपूर्वींपर्यंत त्र्यंबकेश्वर हा पूर्णपणें 'वन-वासी' होता. पांचशें वर्षांपूर्वीं देवापासून कांहींशी दूर, ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं त्रिंबक खेड्याची वस्ती झाली. यात्रिकांची आणि नित्यपूजकांची सोबत नसल्यामुळें त्र्यंबकेश्वर अगदीं एकाकी होता. गगनाच्या पात्रांतून वरुण त्यावर अभिषेक करीत असे; उत्तुंग वृक्ष त्याच्या मस्तकीं पानें ढाळीत असत; वारा त्याचें प्रांगण स्वच्छ करीत असे; आणि रानवेली त्याची सुगंधपूजा बांधीत असत. परंतु पुढें पेशवाईत सारेंच वातावरण बदललें. नानासाहेब पेशव्यांनीं पूर्वीच्या ढांसळत्या मंदिराच्या जागीं त्र्यंबकेश्वराचें हें भव्य मंदिर उभारलें. जोगळेकर नांवाच्या गृहस्थांना त्र्यंबकेश्वराच्या देवस्थानाचे कारभारी नेमून देवाच्या नित्य उपासनेची व्यवस्था केली. ब्राह्मण सेवेकरी देवाच्या नित्य सान्निध्यांत राहून त्रिकाळ पूजा करूं लागले. या व्यवस्थेमुळें भक्त-भाविकांची दर्शना-साठीं दाटी होऊं लागली. स्वाभाविकपणेंच त्रिंबक खेडेंहि

देवाजवळ येऊन वसलें. होळकरांचे फडणीस श्री. पारनेकर यांनीं आठ लाख रुपये खर्चून कुशावर्त या तीर्थकुंडाची सुंदर बांधणी केली. सन् १८६६ मध्यें येथें नगरपालिका स्थापन झाली आणि सन १८७१ मध्यें नाशिक-त्र्यंबक सडक झाल्यामुळें प्रवासहि सुकर झाला.

त्र्यंबकेश्वराच्या मंदिराभोंवतीं चिरेबंदी तट आहे. हें श्री-यंत्राकार मंदिर २६५'×२१८' या आकाराचें असून हेमाडपंती बांधणीचें आहे. मंदिराभोंवतीं प्रशस्त प्रांगण आहे. मंदिराच्या सर्व परिसरांत शिवाच्या कांतीसारखी स्वच्छता आहे. बहुशः हिंदु मंदिरांत न आढळणाऱ्या स्वच्छतेचें हें आल्हादक दर्शन मनाला 'शिव'-दर्शनाची ओढ लावतें. शिवासमोर शुभ्र पाषाणाचा नंदी




त्र्यंबकेश्वर-मंदिर

आहे आणि मागच्या बाजूला अभिषेकजळाची पुष्करिणी आहे. हें मंदिर गोपुरासह पांच-दालनी आहे. मंदिराचें महाद्वार पूर्वाभिमुख असून सर्व मंदिराच्या घडणींत लोखंडाच्या ओतीव कामासारखी सफाई आहे. सर्व बाजूंनीं पाषाणांतील

कोरीव कलेचें सौन्दर्य फुलून आलेलें आहे. पक्षद्वारांच्या घुमटीला बाहेरच्या बाजूनें कोरलेलीं कमळें वास्तव कृष्णकमळाप्रमाणें टवटवीत वाटतात. पाषाणांत ही कोवळीक अनुभवूं देणाऱ्या त्या अज्ञात कलाकाराचें हृदय किती हळवें असेल !

दर्शनासाठीं आपण महाद्वारांतून आंत प्रवेश करूं या. गाभाऱ्याच्या दारांतून आंत डोकावल्यावर समयांचा मंद प्रकाश आणि उदबत्त्यांचा हळवा सुगंध यामुळें आपलें मन दर्शनातुर होतें. मनाच्या अंतर्भागांतून एक आगळा अनुभव फुलून येतो आणि यांत्रिक जीवनाच्या कक्षा उल्लंघून मन जीवनांतील शिवाचा शोध घेऊं लागतें. पाहतां पाहतां सर्व दृश्याचा पसारा लुप्त होतो; दृष्टि अन्तर्मुख होते; हृदयाचा गाभारा सत्त्वगुणाच्या दीपकळीनें उजळून जातो; श्रद्धेचा सुगंध दरवळूं लागतो आणि त्या मंद सोनेरी प्रकाशांत एक अमूर्त, अनिर्वचनीय, जाणीवरूप शिव-तत्त्व आंतल्या डोळ्यांना दिसूं लागतें.



श्रीत्र्यंबकेश्वर

पण हें क्षणभरच. पुन्हा चर्मचक्षु उघडतात आणि दृष्टी-समोर त्र्यंबकेश्वराचें शिवलिंग दिसूं लागतें. अभिषेकपात्रांतून जळ-धारा सतत स्रवत असते. येथें शिवलिंग शाळुंकेच्या वर नसून कळशीभर पाणी मावेल इतक्या खोलगट जागीं आहे. आणि तें ब्रह्मा-विष्णु-महेश असें त्रिमूर्तिरूप आहे. शिवलिंगाच्या मस्तकावर एक लहानशी चीर असून तिच्यांतून गंगा स्रवत असते. त्यामुळें शिवलिंगाच्या या उखळासारख्या खळग्यांत सारखें पाणी सांठतें.

त्या उखळांतून कधीं कधीं सिंहनाद् उठतात आणि ज्वाळाहि उमटतात. त्या ज्वाळांनीं शिवलिंग तापून जातें. मग या क्रुद्ध त्र्यंबकाला शांत करण्यासाठीं पंचामृताचा अभिषेक होतो.

हा स्मशानवासी जोगी पेशवाईत जसा भव्य मंदिरांत राहूं लागला, तसाच सुवर्णरत्नालंकारांनींहि नटूं लागला. देवस्थानाचें उत्पन्न वार्षिक बारा हजारांचें आहे. मंदिराला पांच सोन्याचे कळस आहेत. सुवर्णाचा पंचमुखी मुखवटा आहे आणि नैमित्तिक दिनविशेषांच्या वेळीं घालायचा रत्नखचित किरीट आहे. हा मूळचा म्हैसूरचा किरीट मुसलमानांनी दिल्लीस नेला आणि दिल्लीच्या जामदारखान्यांतून लुटून पेशव्यांनीं तो इथें शिव-मस्तकावर शोभविला.

शिवस्वरूप ब्रह्मगिरि :

या कलाकुसरीनें नटलेल्या शिलामंदिरांतील घडीव शिव-लिंगाचें दर्शन घेऊन, आपण गगनाच्या गाभाऱ्यांत उभ्या असलेल्या स्वयंभू त्र्यंबकाचें – ब्रह्मगिरीचें – दर्शन घ्यायला जाऊं. गगनवेधी गिरिशिखरांना शिवलिंग मानण्याची कल्पनाच मुळीं भव्य आहे. त्या कल्पनेंत सत्य, शिव आणि सुंदर यांची त्रिमूर्तीच जणुं साकारली आहे. ज्याच्या मस्तकांतून गौतमी गंगेचा प्रवाह ओसंडत आहे, तो हा विराट् त्र्यंबकेश्वर वर्षेच्या जळधारांत न्हाऊन निघत असेल, तेव्हां त्याचें रौद्र हास्य जलप्रपातांच्या फेसांतून मेघगर्जने-सारखें प्रगटत असेल.

वृक्षवेलींच्या तोरणांतून वनगंध लुटीत आपण चढूं लागलों कीं, रामदूताचे वंशज आपली वाट अडवतात. त्यांच्या पूर्वजांनीं रावणाच्या मगरमिठींतून दक्षिणापथाची मुक्तता केली असल्यामुळें आपणांकडून करभार – चण्यादाण्यांचा करभार – वसूल कर-ण्याचा वंशपरंपरा हक्क त्यांना प्राप्त झाला आहे. हातात सोटा

नसेल तर भल्याभल्यांची फजीती करण्याचें बळ त्यांच्या सांघिक आक्रमणांत असतें. वायाबायड्यांना छळण्यांत तर त्यांचा विशेष पुढाकार असतो. हा प्रकार त्या ब्रह्मचारी हनुमानानें उघड्या डोळ्यानें पाहिला, तर आपल्या या आचरट वंशजांच्या पापाचरणासाठीं त्याला युगानुयुगें प्रायश्चित घेत बसावें लागेल !

एक आण्याच्या चण्यांनीं त्यांची वासना फजीत करून आपण उभ्या ब्रह्मगिरीच्या चढणीला प्रारंभ करूं. पंजाबांतल्या दोन सत्वृत्त धनवंतांनीं १९०८ मध्यें पांचशें पायऱ्यांचा सोपान बांधून ब्रह्मगिरीची चढण सुगम केली आहे. त्यामुळें सर्वसाधारण माणसांनाहि गंगेचा उगम डोळांभरून पाहतां येतो. ब्रह्मगिरीचा माथा समुद्रसपाटीपासून सव्वाचार हजार फूट उंचावला आहे. या माथ्यावरच्या पठारावर आपण उभे राहिलों कीं, दगडाधोंड्यांचा महाराष्ट्र दृष्टींत सामावूं लागतो. याच डोंगरकपारींचा आणि दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेऊन तीन शतकांपूर्वी स्वातंत्र्याचें जें महाभारत घडलें, त्याच्या रोमांचकारी कथा मनांत तरळूं लागतात.

ब्रह्मगिरीचें हें माथ्यावरचें पठार म्हणजे यादव-काळांतला एक प्रचंड गिरिदुर्ग होता. त्या काळीं बावीस बुरूज असलेला आणि ब्रह्मगिरीच्या उभ्या कड्यांनीं उंचावलेला हा गिरिदुर्ग प्रभावी शत्रूंनाहि अजिंक्य आणि अभेद्य होता. परंतु स्वातंत्र्याचें मूलसत्त्व जिथें सुरक्षित असतें, त्या हृदयांचे बुरूजच फंदफितुरीमुळें धडाधड कोसळूं लागल्यावर या गिरिदुर्गाची काय तमा ? हा यादवांचा किल्ला १६३० मध्यें शहाजहानानें काबीज केला. पुढें १७२० मध्यें त्याच्यावर निजामानें स्वामित्व मिळविलें. १७५२ मध्यें मराठ्यांनीं तो पुनः काबीज केला. पेशवे-कालांत किल्ल्याची स्थिति चांगली असून त्यावर सैन्यहि होतें. पुढें इंग्रजांनीं फितुरीच्या साहाय्यानें ब्रह्मगिरीचा ताबा घेतला.

ब्रह्मगिरीच्या पलीकडच्या उतरणीवर थोडेसें उतरल्यावर गौतमीचें–गोदावरीचें उगमस्थान लागतें. अतिप्राचीन काळीं या ठिकाणीं महर्षि गौतमांचा आश्रम होता. या भूमींत भाताचें पीक काढण्याचा पहिला यशस्वी प्रयोग महर्षि गौतमांनींच केला. एके



औदुंबराच्या मुखांतून प्रकटलेली मूळ गंगा
(समोर दिसणाऱ्या कुंडांत तीन नद्यांचा उगम झालेला आहे.)

दिवशीं एक भुकेली गाय गौतम ऋषींच्या खाचरांत शिरली आणि पोटरीस आलेलें दुधाळ भात खाऊं लागली. आपल्या श्रमांतून आणि घामांतून फुलविलेलें तें शेत खाणाऱ्या गाईचा गौतमांना संताप आला आणि त्यांनीं रागानें तिला एक दर्भ फेकून मारला. त्या ऋषीच्या दर्भाघातानें ती गाय तात्काळ गतप्राण झाली. गौतम घाबरले. गोहत्येचें महापातक आतां दूर कसें करायचें ? त्यांनीं असहाय होऊन आपल्या धर्मविद् सहकाऱ्यांना सल्ला विचारला. त्यांनीं सुचविलें कीं, पापक्षालनासाठीं शंकराची आराधना करावयास हवी. गौतमांनीं शंकराला प्रसन्न करण्यासाठीं घोर तप मांडलें. त्या तपानें शंकर प्रसन्न झाला आणि 'वर माग' अशी त्यानें गौतमांना आज्ञा केली. गौतमांनीं पापक्षालनासाठीं गंगेची

याचना केली. परंतु गंगा तर शंकराची जवळीक सोडायला तयार होईना. शेवटीं वचनाला जागणाऱ्या शिवानें रागानें जटा आपटल्या, तेव्हां ती भूमीवर अवतरली. तिच्या पुण्यपावन जळानें महर्षि गौतमाचें पाप धुऊन निघालें. गौतमामुळें भूमीवर अवतरण झालें म्हणून 'गौतमी गंगा' 'गोदावरी' हें तिचें लौकिक नांव. तिच्या पाण्यावर पोसलेली महाराष्ट्र सारस्वताची गंगाहि तिच्याप्रमाणेंच पापक्षालन करणारी आणि मुक्त जीवन देणारी बनली.

सध्यां एका औदुंबराच्या झाडाखालीं लहानशा कुंडांत अल्पसा जळसंचय आहे, तेंच गंगेचें जन्मस्थान. जवळच एका खडकावर शंकराच्या जटाघाताच्या खुणा दाखवतात. महाराष्ट्राच्या भाग्यविधात्रीचा हा मूलस्रोत पाहून मनांत कृतज्ञता दाटून येते आणि त्या तीर्थजळाचा डोळ्यांना स्पर्श केल्यावर तनामनाला आईचा स्पर्श झाल्यासारखें वाटतें.

या भारावलेल्या मनःस्थितींतच आपण खालीं उतरतों आणि पर्वताच्या पूर्व भागाच्या कुशींत असलेल्या गं गा द्वा रा शीं ये तों. ब्र ह्म गि री च्या माथ्यावर उगम पावलेली गौतमी गंगा नंतर प्रगटते ती इथें गिरिगर्भांतून. दोन प्रचंड उंच कडे इथें एकमेकांना मिळाल्यासारखे दिसतात. त्या कड्यांच्या सांध्यांतून गंगा प्रकटली



गोमुखांतून निघालेली गंगा

आहे. आज त्यावर गोमुख बांधलें आहे. वरच्या बाजूस छोटें मंदिर असून त्यांत गंगामूर्ति स्थापिलेली आहे. गंगाद्वाराजवळच अंधारानें दाटलेलें वराहतीर्थ आहे. वराहतीर्थाजवळ कोलंबिका देवीचें स्थान आहे. गंगाद्वारीं महात्मा चक्रधर कांहीं क्षण विसांवल्याचा उल्लेख 'लीळाचरित्र' या ग्रंथांत सांपडतो. सातशें वर्षांपूर्वी इथें त्या महामानवाचीं पावलें उमटलीं असतील, इथल्या पाषाणांनीं त्याला बसायला आसन दिलें असेल आणि या ब्रह्मगिरीच्या उभ्या कड्यांनीं त्याच्या हृदयाच्या उंचीपुढें क्षणैक मान लवविली असेल.



गंगाद्वार, रामकुंड व राममंदिर

ज्ञानेश्वरांचें गुरुतीर्थ :

ब्रह्मगिरीच्या कुशींत गंगाद्वाराच्या बाजूला 'गोरखगुंफा' नांवाची एक गुहा आहे. गंगाद्वारापासून तिकडे जायला एक लहानशी पाऊलवाट आहे. या गुहेंत गोरक्षनाथ आणि गहिनीनाथ या दोन सिद्ध पुरुषांनीं कांहीं काळ वास केला होता. गोरक्षनाथ हे नाथसंप्रदायाचे आद्य प्रवर्तक. मंत्र-तंत्रांच्या आणि वाममार्गाच्या आहारीं गेलेल्या भारतीय साधनेचें शुद्धीकरण करणारा हा महापुरुष गोदावरीचाच सुपुत्र. इसवी सनाच्या अकराव्या शतकांत उदयास आलेल्या या पुरुषानें आपल्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें सारा भारत भारावून टाकला होता. भारतांतील असा एकहि भूभाग नाहीं आणि अशी एकहि भाषा नाहीं, कीं

ई

हाच एक मध्ययुगीन ग र K? गुंफ।

७.
पुरुष होय गोरक्षनाथानें लोकनीति उंचावण्यासाठीं लोकभाषांचा पुरस्कार केला, स्वतः मळिवलिल्या ज्ञानाची मेघवृष्टि करण्यासाठीं सारा भारतवर्ष पायांखाली घातला; समन्वयाची उदार दृष्टि वापरून पंथोपपंथांना एकत्र आणसें आणि खुल्या व विकृत धर्मकल्पनांना आपल्या प्रखर अनुभवाच्या अग्नीत जाळून टाकले. गोरक्षनाथाचे हें अपूर्व कार्य स्मरून ज्ञानेश्वरांनीं लहिलि आहे :

योगाब्जनीिसरोवरु । वषियविध्वंसैकवीरु ।
तयिं पदीं का सर्वेश्वरु । अभपिकिलि ।'

हा 'वपियविध्यिसैकवीर' गोरक्षनाथ गहनिीनाथांचा गुरु आणि गहनिीनाथ नवृित्तनिाथाचे गुरु. नवृित्तनिाथादि भावंडे आपल्या वडलिांबरोबर ब्रहमगरिीची प्रदक्षणिा करीत असतांना मार्गांत त्याना एक वाघ आडवा आला. वाघाच्या भीतीनें सारी जणें सैरावैरा पळत $p•GtÒ0 €9 M . "à

इतरांची चुकामूक झाली. निवृत्तिनाथांनीं भयामुळें ज्या गुहेचा आश्रय घेतला, त्या गोरख–गुंफेंत गहिनीनाथांचा निवास होता. गहिनीनाथांनीं या सत्त्वगुणसंपन्न तेजस्वी बालकाला आठवडाभर जवळ ठेवून घेतलें आणि आपल्या महनीय गुरूकडून मिळालेला नाथसंप्रदायाचा थोर वारसा निवृत्तिनाथांना दिला. ही घटना इ. स. १२८० च्या सुमारास घडली. या घटनेमुळें ज्ञानेश्वरांना घरच्या घरींच निवृत्तिनाथांसारखा बोधसंपन्न गुरु लाभला आणि नाथपंथाचें लोककल्याणकारी कार्य सातत्यानें ज्ञानेश्वरांकडे आलें. 'ज्ञानेश्वरी' हा आपला ग्रंथ म्हणजे गहिनीनाथांनीं निवृत्तिनाथांना जो ठेवा दिला, त्याचेंच फळ होय, असें ज्ञानेश्वरांनीं 'ज्ञानेश्वरी'च्या शेवटीं स्पष्ट सांगितलें आहे :

तेणें कळिकळित भूतां। आला देखोनि निरुता।
ते आज्ञा निवृत्तिनाथा। दिधली ऐसी॥

"आदिगुरु शंकरा-। लागोनि शिष्यपरंपरा।
बोधाचा हा संसरा। जाला जो आमुतें॥

तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां
सर्व प्रकारीं धांवा। करीं पा वेगीं॥"


आधींच तव तो कृपाळु। वरि गुरुआज्ञेचा बोलु।
जाला जैसा वर्षाकाळु। खवळणें मेघां॥

मग आर्तांचेनि वोरसें। गीतार्थग्रथनमिसें।
वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथ॥

ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं गंगासागर तलावाच्या पश्चिमतीरावर निवृत्तिनाथांचें समाधि–मंदिर आहे. निवृत्तिनाथांनीं इथेंच गुरुचरणांशीं अखेरचा ठाव घेतला. शके १२१८ च्या कार्तिक वद्य त्रयोदशीला ज्ञानेश्वरांनीं आळंदीला जिवन्त समाधि

घेतल्यावर निवृत्तिनाथांचें हृदय शोकानें विदीर्ण झालें. जणुं त्यांच्या जीवनांतील आनंदच समाधिस्थ झाला आणि उरलें तें केवळ उदास रितेपण ! या रितेपणालाहि विद्ध करीत सासवडला सोपानदेवानें निरोप घेतला आणि तापी-तीरावर एदलाबादला मुक्ताई मुक्त झाली.

ज्येष्ठाचिये आधीं कनिष्टानें जाणें
वळचणीचें पाणी आढ्या गेलें !



निवृत्तिनाथांची समाधि


असा उलटा अनुभव आला. कायेच्या कारागारांत आत्मा विव्हळ झाला आणि अखेर ज्येष्ठ वद्य १२ शके १२१९ या दिवशीं गहिनीनाथांच्या तपोभूमींत निवृत्तिनाथांनीं जिवन्त समाधि घेतली. अस्थिचर्मांच्या भिंती उखडून त्यांचा विव्हळ आत्मा आपल्या सर्व सख्यासोयऱ्यांना भेटायला गेला.

मराठी भागवत-परंपरेच्या परमगुरूचें हें समाधि-मंदिर मात्र आज उपेक्षित अवस्थेंत उभें आहे.

त्र्यंबकेश्वराच्या परिसरांत गंगामंदिर, श्रीकृष्ण-मंदिर, परशुराम-मंदिर, श्रीराम-मंदिर, लक्ष्मीनारायण-मंदिर अशीं अनेक मंदिरें आहेत. गांवाच्या उत्तरेस अर्ध्या मैलावर नीलपर्वत नांवाची टेकडी आहे. या टेकडीवर दसनाम गोसाव्यांचा आखाडा असून नीलांबिका देवीचें मंदिर आहे.

तीर्थराज कुशावर्त :

त्र्यंबकेश्वरचें प्रमुख जळतीर्थ म्हणजे तीर्थराज कुशावर्त. ८१ फूट × ७४ फूट एवढें चौकोनी आकाराचें हें कुंड असून



कुशावर्त-तीर्थ

चहूंबाजूंनीं उतरण्यास पंधरा पायऱ्या आहेत. याची पूर्व बाजू मोकळी असून तीन बाजूंनीं ओवऱ्या बांधलेल्या आहेत. एका कोनाड्यांत शेषशायीची मूर्ति आहे. नामदेवाच्या शब्दांत त्र्यंबकेश्वर यात्रेचा महिमा आठवून आपण तीर्थस्नान करूं आणि पुढची वाट आक्रमूं –

वाचे म्हणतां गंगा गंगा । सकल दोष जाती भंगा ॥
दृष्टीं पडतां ब्रह्मगिरी । त्यासी नाहीं यमपुरी ॥
करितां कुशावर्ती स्नानें । त्याचें कैलासीं रहाणें ॥
नामा म्हणे प्रदक्षिणा । त्याच्या पुण्या नाहीं गणना ॥

* * *

## २ : नाशिक

### प्रवाहिनी ब्रह्मवीणा :

ब्रह्मगिरीच्या पश्चिम उतारावर उगम पावलेली गोदावरी पश्चिम सागराचा जवळचा आसरा सोडून पूर्वाभिमुख झाली आणि 'फेडीत जनांचे पापताप, पोखीत तरींचे पादप' तिनें नऊशें मैलांवरील पूर्व-सागराचा ठाव घेतला. बहुतांचें हित साधण्यासाठीं काया-वाचा-मन झिजवणाऱ्या महापुरुषाप्रमाणेंच गोदावरी आपलें 'जीवन' परहितार्थ वेंचीत आहे. या उदात्त जीवनहेतूमुळेंच तिचें 'जीवन' सत्त्वपोषक व प्रेरक बनलें आहे. ब्रह्मगिरीपासून राज-महेंद्रीपर्यंतच्या प्रदीर्घ जीवनयात्रेंत तिनें सुख आणि संस्कृति यांचे अनन्त मळे फुलविले आहेत. आपल्या लेंकरांसाठीं अन्नब्रह्माची उपासना करणारी ही माउली अंतरीं विरागिनी आहे. असुर-निर्दाळणासाठीं तिनें क्षत्रियांच्या खड्‌गांना तेज चढविलें असलें, तरी खळांची खलता दूर होऊन त्यांचीं 'सत्कर्मीं रति' कशी वाढेल, याची खंत तिच्या हृदयीं सतत सलत असते. भूतमात्रांचें 'मैत्र' वाढावें आणि जो जें वांछील तें त्याला मिळावें, अशी तिची अंतरींची तळमळ आहे. या विश्वकुटुंबांत सर्वत्र केवळ सुखाचीच देवाण-घेवाण व्हावी, ही तिची अंतिम आकांक्षा आहे. तिची प्रज्ञा विश्वाचें गूढ उकलण्याइतकी सर्वस्पर्शी असली तरी हृदय-शून्य तत्त्वचर्चेचें तिला वावडें आहे. अव्यभिचारिणी भक्ति हा तिचा स्थायीभाव आहे. तिच्या भक्तिप्रवणतेकडे पाहिलें कीं वाटतें, जणुं प्रभुसंकीर्तनांत रंगलेली महर्षि नारदाची ब्रह्मवीणाच इथें प्रवाहिनी बनून राहिली आहे.

### संस्कृतीचें सुवर्णवैभव :


या आंतरिक सामर्थ्यामुळेंच उगमापासून केवळ पांच योजनांवर—नाशिक येथें—तिनें संस्कृतीचें सुवर्णवैभव निर्माण केलें.

नाशिक आणि नाशिकच्या परिसरांतील गंगावाडी व जोर्वे इत्यादि ठिकाणच्या उत्खननावरून डॉ. सांकलियांसारख्या पुरातत्त्व-विशारदांनीं या भूमींतील मानवाचा ३० लक्ष वर्षांचा विकासक्रम निश्चित केला आहे. नाशिकच्या परिसरांत आदिपाषाणयुग, मध्यपाषाणयुग, ताम्रपाषाणयुग आणि इतिहासाला ज्ञात असलेला प्राचीन काळ या सर्व थरांतील पुराणावशेष सांपडले आहेत. म्हणजेच या लोकमातेनें नागड्या-उघड्या अवस्थेंत वावरणाऱ्या पशुतुल्य आदिमानवाला पाळून-पोसून सुसंस्कृत बनविलें आणि इतरांचीं जीवनें ग्रासून जगणाऱ्यांना परहितार्थ जीवन वेंचण्याची वृत्ति शिकविली !

इतिहास-काळांतलें नाशिक म्हणजे महाराष्ट्राच्या वैभवाचें भांडागारच होतें. प्राचीन काळीं नाशिक आणि गोवर्धन या महाराष्ट्राच्या व्यापारी पेठा होत्या. येथील विणकरांचें कसब जगांतल्या व्यापारी पेठांत कौतुकाचा विषय बनलें होतें. या विणकर-व्यापाऱ्यांचें वजन नाशिकच्या नागर-जीवनांत पहिल्या श्रेणीचें होतें. इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत नाशिकचें रेशमी कापड युरोपच्या बाजारपेठांत नामांकित गणलें जात असे. अशोकाच्या काळीं दक्षिणेंतील धर्ममंत्री नाशिक येथेंच रहात असे. नाशिकच्या विहारांत सिंधमार्गे बुद्ध भिक्षु येत असत. सिंधमधील दत्तमिरी या ठिकाणच्या इंद्राग्निदत्त नांवाच्या गृहस्थानें बांधलेलें एक लेणें नाशिकजवळच्या 'त्रिरश्मी' टेकडीवर अजूनहि आहे. जबलपूरपासून १०० मैलांवर भारहूत नांवाचा एक स्तूप आहे. त्या स्तूपांतील एका खांबावर "नाशिक येथील वसक याची पत्नी गोरक्षिता हिनें देणगीदाखल बांधला" असा उल्लेख आहे.

महाराष्ट्राचे आद्य राज्यकर्ते सातवाहन यांची नाशिक ही गौरवभूमि होती. नाशिकच्या नैर्ऋत्येस पांच मैलांवर आग्रा रस्त्या-वर, रस्त्याच्या डाव्या बाजूला 'त्रिरश्मी' नांवाचा डोंगर आहे. या

डोंगरावर सातवाहनांनीं खोदलेलीं चोवीस लेणीं आहेत. हीं लेणीं आज 'पांडवलेणीं' म्हणून ओळखलीं जातात. इसवी सनापूर्वी २०० पासून इ. स. २०० पर्यंत सुमारें चार शतकें या सातवाहनांनीं महाराष्ट्राचें भाग्य घडविलें. मराठी भूमीच्या या आद्य भाग्यविधात्यांच्या गौरवगाथा पांडवलेण्यांतील शिळांवर अजूनहि जाग्या आहेत. इथल्या स्तंभांवर आणि भिंतींवर



पांडव–लेणीं

प्राकृत भाषेंत एकूण सत्तावीस लेख कोरलेले आहेत. या लेखांतील एका लेखावरून असें समजतें कीं, यांतील क्र. १९ हें लेणें इ. स. पूर्व ११० या वर्षी कृष्ण सातवाहनाच्या कारकीर्दींत दक्षिणेच्या धर्ममंत्र्यानें (श्रमणमहामात्यानें) बांधलें आहे. बुद्ध-प्रतिमा आणि भिक्षुविहार यांनीं व्यापलेल्या या लेण्यांतून कलेचें

वैभवहि प्रकटलेलें आहे. क्र. १ च्या लेण्यांतील पशूंच्या विविध आकृति जिवन्तपणाचा आभास निर्माण करणाऱ्या आहेत.

या लेण्यांतील शिलालेखांतून दोन महनीय व्यक्ति मात्र आपलें मन वेधून घेतात. एक महादेवी गौतमी बलश्री आणि दुसरी तिचा मातृभक्त पुत्र 'गौतमीपुत्र' शातकर्णी. हा सातवाहन-कुलांतला एक नामांकित पुरुष असून त्याचा राज्यकाल इ. स. १०९ ते १३५ असा समजला जातो. क्र. ३ च्या लेण्यांतील लेखांत या राजमाता गौतमीचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे :

"तिला सत्य आवडत असे. दानधर्मांत तिला सुख वाटत असे. सहिष्णुता हा तिचा स्वभाव होता. प्रत्येकाच्या जीवनाकडे ती आदरानें पहात असे. तपश्चर्येंत ती सदा मग्न असे. तिचा मनावरचा तावा वाखाणण्यासारखा होता. शरीर आणि आत्मा शुद्ध ठेवण्यासाठीं ती उपवास करीत असे."

अर्थात् अशा सत्त्वसंपन्न मातेचा पुत्रहि सत्त्वगुणीच असणार. त्यानें आपल्या मातृभक्तीचें प्रतीक आपल्या नांवाशीं जोडण्यासाठीं 'गौतमीपुत्र' हें बिरुद अभिमानानें मिरवले आहे. आईलाहि आपल्या या विक्रमशाली आणि सत्यनिष्ठ पुत्राचा अत्यंत अभिमान वाटत असे. शातकर्णींचा पुत्र पुलुमायी याच्या कारकीर्दींत (इ. स. १४९ मध्यें) कोरलेल्या एका लेण्यांतील लेखांत महादेवी गौतमीनें आपल्या पराक्रमी पुत्राचें गुणगान मुक्तकंठानें गायिलें आहे :

"आपला हा पुत्र राज्य करतांना समस्त प्रजेच्या सुख-दुःखांत समरस होतो. त्यानें क्षत्रिय जातीला भाग्यास चढविलें. शक, यवन, पल्लव इत्यादींना जिंकून घेतलें, सातवाहन वंशाचा उद्धार केला, चातुर्वर्ण्यांतील अनिष्ट प्रकार नाहींसे केले, अनेक भीषण संग्राम करून भूतलावर आपला कीर्तिध्वज उभारला.

"हा माझा पुत्र शातकर्णी सर्व विद्यांचा आधार व सत्-पुरुषांचा आश्रय आहे. राम, केशव, भीम, अर्जुन यांच्यासारखा हा पराक्रमी आहे. याच्याच पराक्रमानें मला 'राजर्षिवधू' हें अभिमानास्पद नांव मिळतें आणि सत्यवचन, दान, क्षमा, अहिंसा अशा थोर गुणांत मला वावरतां येतें. या सर्व घटनांचें स्मरण सतत राहावें म्हणून, मी महाराजमाता व महाराजमातामही हें लेणें भिक्षु-संघाला कायमचें देत आहें. त्याच्या खर्चासाठीं पैशाची-पद्रक हा गांव नेमून दिला आहे."

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासांतील हें माता-पुत्रप्रेम नंतर पुनः एकदां शिवछत्रपति आणि जिजामाता यांच्या संबंधांत प्रगटलें आहे. महादेवी गौतमी, तिचा प्रजाहिततत्पर व पराक्रमी पुत्र शातकर्णी आणि नातू पुलुमायी यांच्या संस्पर्शानें हे पाषाण धन्य झाले आहेत. या सर्व पाषाणांत महाराष्ट्राच्या आद्य राज्य-कर्त्यांच्या पुरुषार्थाचा आणि त्यागाचा इतिहास जागा आहे. या भूमीच्या आदर्श गुणविशेषांची ती पहिली-वहिली साक्ष आहे.

सातवाहनांशिवाय उषावदत्त, आभीर राजा ईश्वरसेन इत्यादि पुरुषांचे दानलेखहि या लेण्यांतून आहेत. यादवांचाहि या भूमीशीं दृढ संबंध आला होता. महाराष्ट्रांतील यादव-वंशाचा मूळ पुरुष दृढप्रहार याचा जन्म नाशिकच्या 'कुन्तिविहार' नामक जैन मंदिरांत झाला. यादवांचे अनेक प्रचंड गिरिदुर्ग नाशिकच्या अंवती-भोंवतीं उभे होते आणि मराठ्यांच्या भाग्यलक्ष्मीचें संरक्षण करीत होते.

<u>नाशिकचा तीर्थमहिमा :</u>

पुराणांनींहि नाशिकचा तीर्थ-महिमा उद्घोषिला आहे. भारतांतील पंचमहातीर्थांत नाशिकची गणना होते. गोदावरी ही दक्षिणापथांतील गंगा–आणि तीहि वृद्धगंगा–असल्यामुळें नाशिक

ही 'पश्चिम काशी' ठरली. पतंजलीच्या महाभाष्यांत या स्थळाचें नांव 'नासिक्य' असें आढळतें. पद्‌मनगर, त्रिकंटक आणि जनस्थान हीं त्याचीं गतयुगांतील नांवें होतीं. नाशिक (नासिक) या नांवाची पौराणिक व्युत्पत्ति दोन प्रकारें सांगितली जाते : दक्षप्रजापतीच्या यज्ञांत नष्ट झालेल्या रुष्ट सतीचें शव घेऊन क्रोधानें संचार करणाऱ्या शिवानें तिच्या अवयवांची इतस्ततः पखरण केली. त्यांत सतीची नासिका या स्थळीं पडली म्हणून हें 'नासिक'. दुसऱ्या मतानुसार, रामानें या ठिकाणीं लक्ष्मणाकरवीं शूर्पणखेचें नाक कापलें, म्हणून हें स्थान 'नासिक' नामाभिधान पावलें.


येथील अगस्त्य ऋषींचें तपोवन आणि उभय गंगातीरांना असलेलीं गौतमतीर आणि वसिष्ठतीर हीं नांवें आर्यांच्या वसाहतीच्या प्रारंभाची साक्ष देतात. अगस्त्य, गौतम, वसिष्ठ या मुनित्रयानें या भूमींत आर्य संस्कृतीची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर सातवाहन-काळांत येथें, वैदिक संस्कृतीशीं बंड पुकारणाऱ्या बौद्धांचें प्राबल्य नांदलें. इ. स. १००० ते १४०० या काळांत इथें जैन परंपरेनें अधिराज्य गाजवलें. जैनांच्या प्रभावाच्या खुणा नासिकच्या उत्तरेस सात मैलांवर असलेल्या चांभारलेण्यांत आजहि विद्यमान आहेत.

हा नाशिकचा पुरातन गौरव मनांत जागा करून आपण गंगास्नान करूं आणि भक्तांची वाट पाहणाऱ्या देवांच्या दर्शनास जाऊं. गोदावरीच्या पात्रांत गोवर्धन-गंगापूरपासून नाशिक-तपोवनापर्यंत एकूण चोवीस तीर्थें आहेत. या तीर्थांतील स्नान-दानाचें वेगवेगळें महिमान तरतमभावानें पुराणांनीं गायिलें आहे. गंगापात्रांतील रामकुंड इ. स. १६९६ मध्यें सातारा येथील चित्रावराव यांनीं बांधलें; लक्ष्मणकुंड इ. स. १७५८ मध्यें सरसुभेदार महादजी गोविंद काकडे यांनीं बांधलें आणि सीताकुंड पेशवे

अनुक्रम ५५९८८

गोपिकाबाईनीं बांधलें. रूढिवादी कर्मठ लोक आणि अंधश्रद्धेच्या भांडवलावर जगणारे तीर्थोपाध्याय यांनीं तीर्थमाहात्म्याचा तरतमभाव ठरवला तर त्यांत नवल नाहीं. परंतु गोदामाईच्या स्वयंभू तीर्थरूपतेवर आणि तिच्या असीम उपकारांवर ज्यांची कृतज्ञ श्रद्धा आहे, त्यांना तिचा प्रत्येक जळबिंदु पवित्र वाटणार.

दर बारा वर्षांनीं सिंहस्थांत नाशिक येथें 'कुंभमेळा' भरतो. या सिंहस्थाच्या पर्वणीसाठीं साऱ्या भारतांतून येथें हजारों भाविक व साधु गर्दी करतात.




सिंहस्थ गोदावरी

काळाराम-मंदिर :

गंगास्नानानंतर पहिलें दर्शन घ्यावयाचें तें येथील काळ्या रामाचें. नाशिकचें हृदयस्वरूप दैवत म्हणजे हा काळा राम. काळ्या रामाचें हें वैभवशाली मंदिर इ. स. १७७२ मध्यें सरदार रंगराव ओढेकर यांनीं बांधलें. या जागीं पूर्वीं गणपति आणि मार्तंड यांचें एक लांकडी मंदिर होतें. त्याच ठिकाणीं हें नवें मंदिर बांधलें गेलें. गणपति आणि मार्तंडाचीं देवळें पायरीजवळ बांधलेलीं आहेत. काळाराम-मंदिराचें बांधकाम बारा वर्षें चाललें होतें. बांधकामासाठीं सगळे दगड रामसेनेच्या डोंगरावरून आणवलेले आहेत. इतक्या परिश्रमांनीं बांधलेल्या या मंदिराला त्या काळीं तेवीस लाख रुपये खर्च आला. या मंदिराच्या घडणींत कलाकुसर नाहीं; परंतु पाषाणांतील नितळपणा त्र्यंबकेश्वरच्या मंदिराइतका आहे. मंदिराच्याभोंवतीं १७ फूट उंच दगडी प्राकार असून त्याला लागून

चारी बाजूंस अग्रशाळा बांधलेल्या आहेत. प्राकाराला चार द्वारें असून पूर्वद्वार हें महाद्वार आहे. राम-मंदिराला साजेसाच मारुतीचा सभामंडप रामाभिमुख आहे. राममंदिराचा आकार २६६ फूट × १३८ फूट एवढा आहे. हें काळ्या पाषाणाचें मंदिर तीन दालनी आहे. तिसरें दालन म्हणजे मंदिराचा गाभारा. गाभाऱ्यांत तीन प्रभावळींमध्यें राम-लक्ष्मण-सीता यांच्या मूर्ति आहेत.

या राजीवलोचन पुरुषोत्तमाच्या दर्शनानें मन उन्मन होतें. सीता-रामांचें दर्शन झाल्याबरोबर दृष्टि वेडी होते आणि तिथेंच खिळून राहते. पाहतां पाहतां वर्तमानाचा विसर पडतो आणि रामायणांतल्या अरण्यकांडांतील दृश्यें चलचित्रपटाप्रमाणें आंतल्या डोळ्यांसमोर तरळूं लागतात...



श्रीकाळाराम-मंदिर, नाशिक

—कडेवर मातीचा घडा घेऊन आणि मुखानें वनवासी रामाची गौरवगाथा आळवून सीतामाई फुलवेलींचें शिंपण करीत आहे. तिचें फुलांसारखें हंसरें मुख आणि सुगंधासारखें सुखद हृदय प्रभूच्या आनंदाला भरती आणीत आहे. तिच्या गाण्याच्या

लकेरीला साथ देण्यासाठीं वारा वेणुकुंजांत भिरभिरत आहे आणि गोदाकांठच्या तरुपर्णांतून कोकिळ कूजन करीत आहे.

परंतु नियतीला हें सहजीवन पाहवलें नाहीं. रावणाचा मामा मारीच इथें मायामृग होऊन आला. त्याच्या मायावी कांचन-कांतीनें सीतेला भुरळ घातली. त्या मृगचर्माचीं कांचोळी तिला हवीशी वाटली आणि प्रभु रामचंद्र पाठलागासाठीं धांवले...

—पुढला इतिहास आठवायलाच नको. साऱ्या गोदाकांठा-वर प्रतिध्वनित होणारी रामाची हृदयवेधी विरहवेदना कल्पनेतहि सहन होत नाहीं. आणि म्हणूनच मन भूतकाचा आश्रय सोडतें आणि पुनः काळाराम-मंदिरांत सीतेसमवेत उभा असलेला राम पाहून समाधान पावतें.


सुंदरनारायण-मंदिर :

शिल्पवैभवानें नटलेलीं नाशकांतलीं प्रख्यात मंदिरें म्हणजे सुंदरनारायण-मंदिर आणि नारोशंकरांचें रामेश्वर-मंदिर. नाशिक-पंचवटीला सांधाणाऱ्या सेतुबंधाच्या जवळ असलेलें सुंदरनारायणाचें मंदिर इ. स. १७५६ मध्यें सरदार गंगाधर यशवंत चंद्रचूड यांनीं दहा लाख रुपये खर्चून बांधलें. मंदिराच्या महाद्वाराशीं जातांच त्यावरील कोरीव कलाकुसरीवर दृष्टि खिळून राहते. महाद्वाराच्या खालच्या दोन बाजूंना दोन कीर्तिमुखें, त्यांच्या बाजूला दोन द्वारपाल, चौकटीवर घुमटींत कोरलेला मंगलमूर्ति गणेश आणि त्यावरील दगडी झडपेच्या वरच्या बाजूस कलासुंदर मेहरप असा कलेचा थाट प्रवेशारंभींच असल्यामुळें मूर्तीहूनहि मंदिर अधिक वेड लावतें. या मंदिराची रचना अशी वैशिष्ट्यपूर्ण आहे कीं, २१ मार्चला सूर्योदयीं सूर्यकिरण सुंदरनारायणाच्या चरणांवर पडतात. पैलतीरावरील पंचवटींतील कपालेश्वराचें मंदिर या मंदिराच्या

अगदीं समोर असून कोणत्याहि एका मंदिरांतून दुसऱ्या मंदिरांतील देवतेचें दर्शन घेतां येतें. 'हरि-हरा'च्या या सन्मुखतेमुळें नाशिक-पंचवटीला 'हरिहरक्षेत्र' असेंहि म्हटलें जातें.

सुंदरनारायणाच्या मंदिरांत मध्यभागीं भगवान् श्रीविष्णु, उजवीकडे लक्ष्मी आणि डावीकडे वृंदा उभी आहे. वामांगीं असणाऱ्या लक्ष्मीचें स्थान हिरावून घेणारी ही वृंदा कोण ? भगवंताच्या आगळ्या प्रीतीचें भाग्य लुटणारी ही भाग्यवती जालंदर दैत्याची पत्नी. शंकराच्या वरानें मातलेल्या या दैत्यानें त्रैलोक्यांत उत्पात मांडला आणि प्रत्यक्ष वरदान देणाऱ्या शंकराशींहि युद्ध ठाणलें. पतिपरायण वृंदेच्या पुण्यबळामुळें जालंदर अजिंक्य ठरूं लागला. त्यामुळें भगवान् विष्णूनें जालंदराचें रूप घेऊन वृंदेचा पातिव्रत्यभंग केला. पुढें विष्णूचें सत्य स्वरूप उघड झाल्यावर क्रुद्ध झालेल्या त्या सतीनें विष्णूला शाप दिला. त्या शापामुळें भगवान् विष्णूची मनःशांति ढळली आणि त्याची सारी काया काळी-निळी झाली. अखेर गोदाजळांत स्नान केल्यावर भगवंताच्या तनामनाचा ताप दूर झाला, अशी पुराणांतरीं कथा आहे. ती अकलंकिनी वृंदा भगवन्तानेंहि पूजार्ह मानली आणि त्यानंतर गृहद्वारीं व देवद्वारीं 'वृंदावनां'त सती-साध्वी तिची अर्चना करूं लागल्या. तुळशीच्या रूपानें आज घरीं-दारीं वंदनीय ठरलेल्या त्या वृंदेची आठवण झाल्यावर डोळ्यांत आसवांची दाटी होते.

सुंदरनारायणासमोरचें कपालेश्वर-मंदिर रामकुंडासमोर पंचवटींत आहे. त्याचा आंतील भाग इ. स. १७३८ मध्यें कोळी मंडळींनीं पांच हजार रुपये खर्च करून बांधला आणि बाहेरील भाग श्री. जगजीवनराम पवार यांनीं बांधला. या मंदिराचें वैशिष्ट्य असें आहे कीं, येथें शिवापुढें नंदी नाहीं. ब्रह्महत्येचें पातक दूर करण्यासाठीं नंदीचें साह्य झाल्यामुळें शिवानें कृतज्ञ भावनेनें



कपालेश्वर-मंदिरांतील शिवलिंग

त्याला सेवामुक्त केलें, असा याविपयींचा खुलासा पुराणांनीं दिला आहे. हें मंदिर उंचावर असल्यामुळें येथून गंगाप्रवाहाचें विहंगम दर्शन घेतां येतें. मंदिरांत कापालिक-पंथी जोग्यांचा संचार नेहमीं दृष्टीस पडतो.

नारोशंकर राजेबहादुरांनीं इ. स. १७४७ मध्यें बांधलेलें पंचवटींतलें रामेश्वरमंदिर हें एक शिल्पकलेचें लीलास्थळ आहे. मंदिराच्या उभारणीचा खर्च १८ लाख रुपये झाला आहे. या मंदिराच्या दर्शनानें सौंदर्यवेड्या दृष्टीचें पारणें फिटतें. जिथें पहाल तिथें कलाकाराच्या करांगुलींतून कलेचा उत्कट साक्षात्कार प्रगटलेला दिसेल. मंदिराच्या बाह्य कटिबंधावर कोरीव नक्षीची जाळी आहे. सभोंवतीं तिच्यावर त्याच लांबीची मयूरपंक्ति चोंचींत माळा घेऊन उभी आहे. त्यावर पुन्हां कीर्तिमुखांची तशीच ओळ. वर पाहिलें तर चारी दिशांना पाषाणांचे जोगी पद्मासन घालून बसलेले दिसतात. एका हातांत माळ आणि दुसऱ्या हातांत पोथी.

मस्तकावर जटाभार आणि मुखावर योगसिद्धीचें तेज. ऊन-पावसानें छिन्नभिन्न होऊं लागलेले हे जोगी वृत्तीनें अजूनहि अचल आणि अविकारी आहेत. मंदिराच्या बाह्य घडणींत व्याघ्र, हत्ती, वानर अशा अनेक पशूंच्या आकृतींनाहि स्थान मिळालें आहे. मंदिराभोंवतीं अकरा फूट उंचीचा तट असून त्याला तीन कोनांना तीन सुंदर मेघडंबऱ्या आहेत. पुढील बाजूची डाव्या हाताची चौथी मेघडंबरी गोदावरीच्या महापुरानें गिळंकृत करून टाकली, असें म्हणतात. या मंदिरांत प्रसिद्ध 'नारोशंकरी घंटा' आहे. ही प्रचंड घंटा वसईच्या संग्रामांत पोर्तुगीज चर्चमधून आणलेली आहे. तिच्यावर '१७२१' असा सन कोरलेला आहे.

याशिवाय नाशिक-पंचवटींत अनेक मंदिरें आहेत. किंबहुना हें मंदिरांचेंच नगर आहे. काळाराम-मंदिराच्या उत्तरेस एका वटवृक्षाच्या छायेंत 'सीतागुंफा' आहे. नाशिक विभागांत गंगाकाठीं यशवंतराव-महाराजांचें समाधि-मंदिर आहे.

नाशिक-पंचवटींतील बहुतेक प्रमुख मंदिरें पेशवाईतलीं आहेत. मोंगलांच्या ताब्यांत नाशिक असतांना त्याचें 'गुल्शनाबाद' असें नामकरण झालें होतें आणि येथील २५ प्रमुख मंदिरें उध्वस्त झालीं होतीं. इ. स. १७५० मध्यें पेशव्यांनीं नाशिक-त्र्यंबकेश्वरावर ताबा मिळविला आणि अमाप मराठी दौलत नाशिकच्या जीर्णोद्धारासाठीं ओतली गेली. नव्या स्वाभिमानाच्या उर्मीतून मंदिराची उभारणी झाली आणि स्वत्वाच्या जागत्या ज्योति मंदिरा-मंदिरांतून तेवूं लागल्या. हीं सर्व प्रमुख मंदिरें हेमाडपंती बांधणीचीं आहेत. काटकोन - त्रिकोण आणि चौकोन असे पाषाणांना आकार देऊन या मंदिरांची घडण केलेली आहे. समोर महाद्वार, त्याच्या दोन्ही बाजूंना दोन पक्षद्वारें, प्रत्येक द्वारावर द्वारमंडप आणि त्यावर सुंदरशी बैठी घुमटी. त्यापुढें

चौरसाकृति सभामंडप. सभामंडपावर कलापूर्ण घुमट, त्यामागें देवतेचें वर्तुलाकृति गर्भागार आणि गर्भागारावर निमुळतें होत गेलेलें शिखर—अशा प्रकारचीं हीं प्रमाणबद्ध, नितळ, कलापूर्ण मंदिरें पुनः पुन्हा पहात रहावीशीं वाटतात.

बाह्य दृष्टीला प्रेक्षणीय न वाटणारें एक 'दर्शनीय' स्थळ नाशिकच्या परिसरांत आहे. नाशिकपासून चार मैलांवर टाकळी नावाचें एक गांव आहे. या टाकळीसच महाराष्ट्रधर्माचे संजीवक समर्थ रामदास यांनीं बारा वर्षें राममंत्राचें पुरश्चरण करून जीवन-सिद्धीची शिदोरी तयार केली. शके १५४१ च्या फाल्गुन शुद्ध ८ ला लग्नमंडपांतून निसटलेला हा बालयोगी रामचरणांचा शोध घेत घेत शके १५४२ च्या चैत्र शुद्ध १ ला पंचवटींत श्रीरामाच्या मूर्तीपुढें उभा ठाकला आणि अंतःकरणाच्या गाभ्यांतून त्यानें श्रीरामाला हांक दिली—

रामचंद्रा ! तुझा वियोग । ऐसा नको रे प्रसंग ।
तुजकारणें सर्व संग । त्यक्त केला ॥
रामा ! तुझिया स्वामीपणें । मी हें ब्रह्मांड मानीं ठेंगणें ।
स्वामी ! तुजविण कोण जाणें । अंतर आमुचें ॥

जणुं ही हांक प्रभु रामचंद्रानें ऐकली—देवानें दासाचें मनोगत जाणलें आणि जीवनशुद्धीची आज्ञा दिली.

प्रभूची आज्ञा घेऊन समर्थांनीं पुरश्चरणाचा संकल्प केला आणि त्यासाठीं गांवापासून दूर असलेल्या टाकळी या खेड्याचा आश्रय घेतला. टाकळीजवळ नंदिनी नांवाची एक लहानशी नदी गोदेला मिळत असल्यानें तिथें संगमस्थानहि निर्माण झालेलें होतें. या संगमावर, तरुवेलींच्या सहवासांत, रविकिरणांच्या साक्षीनें गोदावरीच्या तीर्थजळांत समर्थांनीं आत्मशुद्धि साधली आणि भावी जीवनकार्याचें अभेद्य पायाभरण केलें. संगमावर स्नानसंध्या

करून, पात्रांतच ऊभें राहून, सूर्य मस्तकीं येईपर्यंत त्रयोदशाक्षरी राममंत्राचा जप करावा. मग पंचवटीस जाऊन मधुकरी मागावी. ती रामाला अर्पण करावी आणि नंतर रामाचा प्रसाद म्हणून ती सेवन करावी – असा या बारा वर्षांच्या बालयोग्याचा दिनक्रम होता. दुपारपासून सायंकाळपर्यंतचा त्यांचा काळ टाकळीस लेखन-वाचनांत व नाशिक-पंचवटींत पुराण-प्रवचनें ऐकण्यांत जात असावा. या पुरश्चरणाच्या काळांत त्यांनीं स्वहस्तें लिहून घेतलेली वाल्मीकि-रामायणाची एक प्रत धुळ्याच्या समर्थ वाग्देवतामंदिरांत आजहि सुरक्षित आहे. हें केवळ बारा वर्षांचें पोर इतकी कठोर साधना आचरतांना पाहून नाशिकवासी नागरिक आश्चर्यविमूढ होत असतील आणि या बालसाधकाच्या मुखावरील निग्रहाचें अपूर्व तेज पाहून त्यांच्या माना आदरानें लवत असतील. नाशिक-पंचवटीचा सारा परिसर समर्थ-स्पर्शानें भारावलेला आहे. दत्तसंप्रदायाचे पुनरुज्जीवक श्रीनरसिंहसरस्वती, मध्वमुनीश्वर आणि निरंजन रघुनाथ या प्राचीन सत्पुरुषांची पद-धूलि नाशिकच्या गांवठाणांत सांडली आहे. या भूमीला गेल्या हजारों वर्षांत अनेक सिद्धसाधकांचे आणि संतमहंतांचे पाय लागले असतील; परंतु सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत जो महान् स्वातंत्र्य-यज्ञ झाला, त्याचें पौरोहित्य करणारा महर्षि याच परिसरांत जीवनसाधनेचीं पहिलीं पावलें टाकीत होता – ही ताजी साक्ष निःसंशय स्फूर्तिदायी आहे. ही भूमि रामाच्या पावलांनीं पावन झालेली आहे. रामाच्या आठवणींनीं भारलेली आहे. समर्थांना इथेंच रामाचा उत्कट शोध लागला. त्यामुळें या पुण्यभूमीचा निरोप घेतांना मन तिला उद्देशून गाऊं लागतें –

तुझ्या धूलिमाजीं वाटे लोळूणें सुखाचें,  
जिथें पाय पावन फिरले राम-जानकीचे !